पुण्यनगरी पु-पा-१.

# मुलाची खरेदी-विक्री करणाऱ्या टोळीला अटक

## चिमुरड्याची सुखरूप सुटका



**। नालासोपारा** : नालासोपारा पूर्वेकडील अलकापुरी येथे राहणाऱ्या महिलेच्या दोन महिन्यांच्या मुलाची खरेदी विक्री करणाऱ्या पाच आरोपींच्या टोळीला गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पोलिसांनी गुजरातमध्ये सापळा रचून अटक केली. अपहरण करून नेलेल्या दोन महिन्यांच्या चिमुकल्याची पोलिसांनी सुखरूप सुटका करून त्याच्या आईच्या ताब्यात दिले. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नालासोपाऱ्याच्या अलकापुरी येथे राहणारी २३ वर्षीय महिला ही कचरा वेचण्याचा व्यवसाय करते. तिला दोन महिन्यांचा गोंडस मुलगा आहे. तिची गरीब परिस्थिती असल्यामुळे मुलाचा सांभाळ करणे अवघड होते. त्यामुळे विरार कुंभारपाडा येथे राहणारी व कचरा वेचणारी ओळखीची मावशी आहे. तिने मुलाचा चांगला सांभाळ करणारे श्रीमंत घरातील लोक ओळखीचे असल्याचे आमिष मुलाच्या आईला दाखवले. मावशीने तिच्या ओळखीच्या आरोपी कृष्णाला याबाबत कल्पना दिली. आरोपी कृष्णासह गोविंद परमार (७१) आणि मुकेश दहिया (४८) या तिघांनी हे मूल वलसाड येथे राहणारे व एका कंपनीत काम करणारे भूषण सिंग (४६) यांना विकण्याचे ठरवले. भूषण सिंग यांना पाचही मुली असल्याने हा मुलगा विकत घेण्याचे त्यांनी ठरवले. २७ डिसेंबरला सकाळच्या वेळी भूषण यांनी कृष्णा याला २ लाख ३५ हजार रुपये देऊन दोन महिन्यांचे मूल विकत घेऊन वलसाड येथील घरी घेऊन गेले. फसवणूक झाल्याचे या महिलेच्या लक्षात आल्यावर तिने सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल केला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणी गंभीर दखल घेत विरार पोलीस ठाण्यात मानवी तस्करी प्रकरणी गुन्हा दाखल केला. जलदगतीने अपहरण झालेल्या मुलाचा शोध घेण्यासाठी गुन्हे शाखा युनिट तीनच्या पोलिसांनी तीन पथके तयार केली. पोलीस पथकांनी तांत्रिक बाबी तपासून पोलीस उपआयुक्त, (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा. पोलीस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक उमेश भागवत, पोलीस हवालदार अशोक पाटील, सागर बारवकर, सचिन घेरे, शंकर शिंदे, मुकेश तटकरे, अश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव यांनी सापळा रचून आरोपी बाळकृष्ण ऊर्फ कृष्णा कांबळे (३२) याला सफाळे येथून तसेच भाईंदरमधून गोविंद परमार (७१) आणि वलसाड येथून मुकेश दहिया (४८) या तिघांना ताब्यात घेतले. तर मूल विकत घेणाऱ्या भूषण सिंग (४६) यांनाही वलसाड येथून ताब्यात घेत चिमुकल्याची सुटका केली आहे.

सकाळ पु-पा-१.

# पोलिस भरतीतील वाहनचालक पदांची मैदानी चाचणी पूर्ण

भाईंदर, ता. ५ (बातमीदार) : मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाकडून सुरू असलेल्या भरती प्रक्रियेतील वाहनचालक पदांसाठीची मैदानी चाचणी पूर्ण झाली आहे. आता यानंतर पोलिस शिपाई या पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मैदानी चाचणीतील उमेदवारांची गुणांची यादी जाहीर करण्यात आली आहे. आता या उमेदवारांना कौशल्य चाचणी द्यावी लागणार आहे. या चाचणीचे ठिकाण व वेळ याबाबत उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेलवर, मोबाईल क्रमांकावर कळवण्यात येणार आहे.

पोलिस आयुक्तालयाकडून दोन जानेवारीपासून ९९६ पोलिस शिपाई आणि १० वाहनचालक पदांसाठी थेट भरती प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर ही भरती प्रक्रिया सुरू आहे. सुरुवातीला वाहनचालक पदांसाठी उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली. वाहनचालक पदांसाठी १२३७ अर्ज आले असून त्यात ११९६ मुले, तर ४१ मुलींचा समावेश आहे. चालकपदाकरता अर्ज केलेल्या उमेदवारांच्या मैदानी चाचणीचे गुणपत्रक गुरुवारी जाहीर करण्यात आले. mbvv.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर ही यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

### शंका असल्यास काय कराल?

उमेदवारांना आपल्या गुणांबाबत शंका असल्यास पोलिस उपायुक्त (मुख्यालय) यांना नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे भेटून शंकानिरसन करू शकतात. तसेच sheetbransh१.mb.vv@mahapolice.gov.in या मेलवर किंवा ०२२- ३५००६११४ या क्रमांकावर ५ जानेवारी संध्याकाळी ५ पर्यंत संपर्क साधू शकता, असे पोलिस आयुक्तालयाकडून सांगण्यात आले.

# रिवॉर्ड रकमेच्या बहाण्याने भाईंदरमध्ये व्यापाऱ्याला गंडा

भाईंदर, ता. ५ (बातमीदार) : क्रेडिट कार्डवर जमा झालेल्या रिवॉर्ड पॉईंटची रक्कम खात्यात जमा करून देण्याच्या बहाण्याने भाईंदर येथील व्यापाऱ्याची एक लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.

भाईंदर पश्चिम येथे राहणारे विश्वनाथ खेमका यांचा कपडे विक्रीचा व्यवसाय आहे. गेल्या दहा वर्षांपासून ते व्यवहारांसाठी क्रेडिट कार्डचा वापर करतात. काही दिवसांपूर्वी अनोळखी व्यक्तीचा त्यांना फोन आला. त्यांच्या क्रेडिट कार्डवर रिवॉर्ड पॉईंट जमा झाले असून त्याची रक्कम खात्यावर जमा करायची आहे. त्यामुळे खात्याचे तपशील द्यावे लागतील, असे या व्यक्तीने सांगितले. सुरुवातीला खेमका यांनी त्याकडे लक्ष दिले नाही, पण एक दिवस या व्यक्तीने त्यांना रिवॉर्डची रक्कम खात्यात जमा करण्यासाठी एक लिंक पाठवली व त्या लिंकवर ई मेल आयडी पाठविण्यास खेमका यांना सांगितले. खेमका यांनी त्या लिंकवर आपला ई-मेल आयडी पाठवून दिला.

खेमका हे त्या व्यक्तीशी बोलत असताना त्यांना शंका आली, त्यामुळे त्यांनी बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधला. त्यावेळी त्यांच्या खात्यातून एक लाख सहा हजार रुपयांची रक्कम काढली असल्याचे त्यांना समजले. त्यावर खेमका यांनी तातडीने बँक खाते ब्लॉक केले. त्यानंतर खेमका यांनी सायबर गुन्हे विभागाकडे तक्रार केली. सायबर खात्याने केलेल्या चौकशीत खेमका यांच्या खात्यातून हरयाणा येथील देवेंद्र कुमार याच्या खात्यात रक्कम जमा झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर खेमका यांना लिंक पाठविणाऱ्या व्यक्तीसह हरियाणा येथील देवेंद्र कुमार याच्या विरोधात भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

1

सकाळ पृ.पा.१.

# रस्ते कराविरोधात राजकीय पक्ष आक्रमक

## आंदोलन छेडण्याचा इशारा

भाईंदर, ता. ५ (बातमीदार) : नवीन वर्षात नागरिकांना दहा टक्के रस्ते कर लावण्याचा निर्णय मिरा-भाईंदर महापालिकेने नुकताच घेतला आहे. मात्र या निर्णयाविरोधात राजकीय पक्ष आक्रमक झाले आहेत. या रस्ते कराविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भारतीय जनता पक्षाने दिला आहे, तर काँग्रेसनेही या निर्णयाचा तीव्र शब्दांत विरोध केला.

उत्पन्न वाढीच्या दृष्टीने तसेच शहरात बांधण्यात येणाऱ्या सिमेंट काँक्रीट रस्त्यांसाठी दहा टक्के रस्ते कर लावण्याचा निर्णय आयुक्त दिलीप ढोले यांनी घेतला आहे. नवीन आर्थिक वर्षात नागरिकांच्या मालमत्ता कराच्या देयकांमध्ये हा कर समाविष्ट करण्यात येणार आहे. रस्त्यांसाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या परतफेडीसाठी हा कर लावणे आवश्यक असल्याचे प्रशासनाचे मत आहे, पण या कराला राजकीय पक्षांनी विरोध केला आहे.

मिरा-भाईंदर महापालिका प्रशासनाने प्रशासकीय राजवट असताना सर्वसामान्य जनतेवर नव्याने रस्ता कर लावण्याचा निर्णय घेतला असून तो अयोग्य आहे. हा प्रकार म्हणजे करदात्या नागरिकांवर नवा आर्थिक भुर्दंड लावण्यासारखा आहे, त्यामुळे हा कर रद्द करावा, अशी मागणी काँग्रेस जिल्हा प्रवक्ता प्रकाश नागणे यांनी केली आहे. नगरसेवक पदाचा कालावधी संपल्याने राज्य शासनाने प्रशासकीय राजवट लावली आहे. राज्यातील राजकीय परिस्थिती पाहता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात अनिश्चितता आहे, त्यात प्रशासकीय राजवटीत प्रशासक या नात्याने आयुक्तांकडून करवाढीसारखे जनविरोधी निर्णय घेतले जात असल्याचा आरोप नागणे यांनी केला आहे.

### सर्वसामान्यांना वाढीव कराचा फटका

भाजपनेही रस्ते कराला विरोध केला आहे. या वाढीव कराचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसणार आहे. सध्या नगरसेवकांची मुदत संपुष्टात आली असल्यामुळे आयुक्तांना प्रशासकीय अधिकार प्राप्त झाले आहेत. या अधिकाराचा वापर करून रस्ते कर लागू करणे तांत्रिकदृष्ट्या योग्य ठरणार नाही. निवडणुका झाल्यानंतर निवडून येणारे नगरसेवक या करासंदर्भात योग्य निर्णय घेतील. रस्ते कराद्वारे नागरिकांवर कराचा बोजा लादला जाणार असेल तर भाजप त्याला तीव्र विरोध करेल आणि आवश्यकता भासल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असा इशारा भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. रवी व्यास यांनी दिला आहे.

पालिका प्रशासनाकडून कित्येक भागात सुविधा न देता अनेक वर्षांपासून मलप्रवाह कर वसूल केला जात आहे, त्यात शहरातील मलनिस्सारण केंद्र बंद आहेत. याबाबतीत जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या वतीने आयुक्तांना निवेदनही दिले होते. युवक काँग्रेसने जनआंदोलन करून ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. सुविधा देणार नसाल तर मग कर का भरावेत, असा सवाल काँग्रेसने केला आहे. शहरातील मुख्य, अंतर्गत रस्त्यांची वाट लागलेली असताना रस्ता दुरुस्तीच्या नावाखाली दर महिन्याला लाखो रुपयांची उधळपट्टी केली जात आहे. त्यामुळे या निर्णयाचा पुनर्विचार न केल्यास रस्ता कर आकारणी विरोधात जनआंदोलन करण्याचा इशारा काँग्रेसने दिला आहे.

पुढारी पु.पा.३.

# निर्मळ येथे वसई- विरार महानगर पत्रकार संघातर्फे कार्यक्रम

**वसई** : आद्य संपादक स्व बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती आणि पत्रकार दिनाचे औचित्य साधून, उद्या दि.६ जानेवारी.२०२३, शुक्रवार रोजी वसई विरार महानगर पत्रकार संघातर्फे सर्वच पत्रकारांसाठी 'पत्रकार संरक्षण कायदा' व 'बातमीतील शुद्धलेखन' याविषयांवर मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे.

वसई पश्चिमेच्या निर्मळ येथील 'उषःकाल' विश्रामगृह सभागृहात सकाळी १०.३० वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार जगदीश भोवड आणि मराठी व्याकरणाचे अभ्यासक, तथा जेष्ठ पत्रकार शरद विचारे उपस्थित राहणार आहेत. निमंत्रित पत्रकारांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून, स्व.बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करतानाच, मार्गदर्शनाचाही लाभ घ्यावा, असे आवाहन पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिलराज रोकडे यांनी केले आहे. 'दर्पण' कार स्व. स्व.बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती सर्वत्र पत्रकार दिन म्हणून साजरी केली जात असून वसईत या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

पुढारी पु.पा.३.

# वसई-भाईंदरमधील बेपत्ता मुलांचे गूढ?

**भाईंदर:** २०२२ या वर्षात वसई विरार आणि मीरा भाईंदर शहरातून ६५० अल्पवयीन मुले-मुली बेपत्ता झाली होती. यापैकी ५८२ मुलामुलींचा शोध लागला असून त्यातील अद्याप ६८ मुले-मुली बेपत्ता आहेत. वसई विरार शहरातून अल्पवीयन मुले-मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले आहे. २०२२ या वर्षात वसई विरार आणि मीरा भाईंदर शहरातून ६५० अल्पवयीन मुले-मुली बेपत्ता झाले होते. त्यामध्ये १९६ मुले आणि ४५४ मुलींचा समावेश होता. या बेपत्ता मुला-मुलींच्या शोधासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली होती. बेपत्ता मुला-मुलींपैकी ५८२ जणांचा शोध लागला आहे. त्यामध्ये १८६ मुले आणि ३९६ मुलींचा समावेश आहे, परंतु अद्याप ६८ मुले-मुली बेपत्ता आहेत. संवेदनशील प्रकरणांचा लवकर तपास व्हावा यासाठी २०१३ पासून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी बेपत्ता झाल्यास अपहरणचा कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येतो.

सकाळ पु. पा. १.

## वर्षभरात २९ खून, २३ सोनसाखळी चोरीच्या घटनांची नोंद

# वसईत गुन्हेगारांचे भय




**वसई, ता. ५ (बातमीदार) : वसई-विरार शहरे रक्तरंजित थराराने भयभीत झाली होती. वर्षभरात एकूण २९ खून झाले, तर जबरी चोरी करणाऱ्या चोरांनी २३ नागरिकांना सावज केल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे शहरात गुन्हेगारीने डोके वर काढल्याचे यावरून समोर येत आहे.**

वसई-विरार, मिरा-भाईंदर शहर आयुक्तालयाच्या क्षेत्रात गेल्या वर्षभरात ३६ खुनाच्या घटनांची नोंद झाली आहे; तर ३५ जबरी चोरींची नोंद झाली आहे. फक्त वसई-विरारमध्ये २९ खून आणि २३ जबरी चोरींची नोंद आहे. वसई-विरार शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. दाटीवाटीच्या वस्तीत गुन्हेगार आश्रय घेत गुन्हे करत आहेत. अनेकदा अमली पदार्थ तस्करी केली जात आहे. अशा गुन्हेगारांवर पोलिसांकडून कारवाईही केली जात आहे. त्यातच आपसातील मतभेद, क्षुल्लक वाद, जमिनींवरून होणाऱ्या हाणामाऱ्या यासह अन्य कारणाने हत्यारे उगारली जात आहेत. त्यात अनेकांना जीव गमवावा लागला आहे.

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत अधिकाधिक गुन्हे हे वसई-विरार शहरात घडले आहेत. यात भर रस्त्यात तलवारीने वार, गोळ्या झाडणे असे प्रकार घडले आहेत. असे असले तरी पोलिसांना यातील अनेक गुन्हेगारांना गजाआड करण्यात यश आले आहे. तसेच पोलिसांनी सोनसाखळी चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत मुद्देमाल जप्त केला; परंतु काही गुन्ह्यांची उकल अद्याप झाली नाही.

### खुनाच्या सर्व गुन्ह्यांची उकल

पोलिसांना वसई-विरार परिसरात घडलेल्या २९ घटनांतील सर्व खुनाच्या गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आहे; तर जबरी चोरीच्या २३ घटनांपैकी आतापर्यंत १३ गुन्ह्यांची उकल झाली असून १० प्रकरणांचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. पोलिस आयुक्तालय क्षेत्रात खुनाच्या ३६; तर ३५ जबरी चोरींच्या घटनांची नोंद झाली आहे.







### येथे सर्वाधिक गुन्हे

वसई-विरार शहरात सर्वाधिक १० खून हे वालीव पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडले आहेत, त्यापैकी सर्व गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले; तर सोनसाखळीच्या सर्वाधिक सात घटना या विरार आणि आचोळे पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्या आहेत.



### पोलिसांकडून जनजागृती

वसई-विरार शहरात सोनसाखळी चोरांपासून सावध राहण्यासाठी पोलिसांकडून बैठक, जनजागृती आदी मोहीम घेतली जाते. तसेच संशयास्पद व्यक्तींची माहिती पोलिसांना द्या, असे आवाहन केले जाते; परंतु अनेक जण कोणतीही सावधानता न बाळगता अंगावरील दागिने घालून फिरतात. पण अशा बेसावध नागरिकांना लक्ष्य करत चोरटे दागिने घेऊन पसार होतात.



लोकसत्ता ५.२.१९



## वसईमध्ये गॅसवाहिनीची गळती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** पालिका ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे गुजरात गॅस कंपनीच्या गॅसवाहिनीला गळती लागल्याची घटना गुरुवारी सकाळी वसईच्या एव्हरशाइन भागात घडली. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेची माहिती मिळताच गुजरात गॅस कंपनीचे कर्मचारी आणि पालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने पाइपलाइन बदलल्यामुळे ही गळती थांबली. यामुळे मोठी दुर्घटना थोडक्यात टळली.

वसई पूर्वेच्या एव्हरशाइन गोखिवरे रस्त्यावर वसई-विरार महापालिकेकडून गटार दुरुस्तीचे काम सुरू आहे. त्यासाठी पालिकेच्या ठेकेदाराने जेसीबीद्वारे खड्डा खोदला असताना मुख्य गॅसवाहिनीला त्याचा धक्का लागला. त्यामुळे गॅस गळतीला सुरुवात झाली. या घटनेची माहिती स्थानिकांनी महापालिकेच्या अग्निशमन दलाला माहिती दिली. यानंतर अग्निशमन दलाने गुजरात गॅस कंपनीला माहिती देत त्यांच्या मदतीने तातडीने ही गळती थांबवली. या वेळी पाइपलाइन बदलून नवीन टाकण्यात आली. हे दुरुस्तीचे काम तब्बल दोन तास सुरू होते. या वेळेत गॅसपुरवठा बंद करण्यात आला होता.

लोकसत्ता ५.२.१९

## वसईत ११ फेब्रुवारीला लोकन्यायालयाचे आयोजन

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** विविध प्रकारची प्रकरणे तडजोडीने व सामंजस्याने सोडविण्यासाठी वसई न्यायालयात ११ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे. यात प्रलंबित असलेली अनेक प्रकरणे मार्गी लावली जाणार आहेत.

राष्ट्रीय लोकन्यायालयात दिवाणी स्वरूपाची, तडजोडीस पात्र फौजदारी स्वरूपाची, वैवाहिक स्वरूपाची '१३८ एनआय अॅक्ट चेक' संबंधीची अन्वये दाखल झालेली प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, मोटार अपघात नुकसानभरपाई प्रकरणे, कौटुंबिक वाद प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, वीज व पाणीविषयक देयक प्रकरणे, महसुली प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे इत्यादी तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांची प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यांनी या लोकन्यायालयात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

आपली प्रकरणे लोकन्यायालयात ठेवण्यासाठी, ज्या न्यायालयात प्रलंबित असतील, त्या न्यायालयात अर्ज करावा. तसेच दाखलपूर्व प्रकरणाबाबत तालुका विधि सेवा समितीचे लिपिक एस. बी. राठोड यांच्याशी संपर्क साधावा. सर्व पक्षकारांनी प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने सोडविण्याकरिता राष्ट्रीय लोकन्यायालयाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा न्यायाधीश १ तथा विधि सेवा समिती तालुका अध्यक्ष डॉ. सुधीर एम. देशपांडे यांनी केले आहे.

पुण्यनगरी ५-२-१९.

## मीरा रोडमधील मुलांच्या हॉस्टेलमध्ये चोरी

**मीरा रोड :** मीरा रोड येथील हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या मुलांचे मोबाईल व दोन लॅपटॉप हॉस्टेलमधून चोरी करून नेल्या प्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा रोडच्या व्ही.जे.व्ही. जैन हॉस्टेल, बाप्पा सीताराम मंदिर जवळ येथे राहणारे सौरभ दिग्रजा हा विद्यार्थी एन. एल. दालमिया कॉलेज येथे एम.बी.ए.चे शिक्षण घेत असून त्यासाठी तो हॉस्टेलमध्ये राहतो. त्यांचे रूममध्ये मिहीर, अभिषेक असे रूम पार्टनर राहतात, ते सर्व विद्यार्थी आहेत. सौरभ व मिहीर कॉलेजचा प्रोजेक्ट करून पहाटे झोपले होते. त्यांनी रूमचा दरवाजा बंद केला नव्हता व ते दुपारी १२ वाजता झोपेतून उठले असता ठेवलेले मोबाईल व लॅपटॉपवर चोरी झाल्याचे आढळून आले. त्यांनी हॉस्टेल वॉर्डनकडे तक्रार केली; परंतु त्याचा तपास लागला नाही. हॉस्टेलचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता सकाळी साडेसातच्या दरम्यान अनोळखी व्यक्ती रिकाम्या हाताने हॉस्टेलचे इमारतीत प्रवेश करत असल्याचे दिसले. काही वेळाने तीच व्यक्ती हातात बॅग घेऊन जात असल्याचे दिसले. या चोराच्या विरोधात त्यांनी १० हजार किमतीचा विवो मोबाईल, २० हजार किमतीचा एक लिनोव्हो लॅपटॉप व एच.पी. कंपनीचा एक लॅपटॉप चोरीला गेल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी अधिक तपास नयानगर पोलीस करत आहेत.

पुढारी पा. नं. २०



# मिरा-भाईंदर पालिका हद्दीत अनधिकृत बांधकामांवर हातोडा

## प्रभाग समिती १ व ४ मध्ये तोडक कारवाई


**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेच्या प्रभाग समिती क्रमांक १ व ४ मधील अनधिकृत बांधकामांवर अतिक्रमण निर्मूलन विभागाकडून तोडक कारवाई करण्यात आली. प्रभाग समिती क्रमांक १ अंतर्गत मौजे राई गावातील ३ पक्क्या रूमच्या अनधिकृत बांधकामासह भाईंदर पश्चिमेकडील भोला नगर येथील फुटपाथवरील १८ शेडवर तसेच मौजे उत्तन येथील प्रस्तावित कत्तलखान्यांच्या जागेतील पत्रा व अँगलच्या अनधिकृत शेडसह तेथील टपऱ्यांच्या बांधकामावर जेसीबी व मजुरांच्या सहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली. याचप्रमाणे प्रभाग समिती क्रमांक ४ अंतर्गत मौजे गोडदेवच्या सर्वे क्रमांक ५२१२ जागेतील ओम साई इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये प्रस्तावित असलेल्या १८ मीटर रुंद रस्त्याने बाधित होणाऱ्या ४ औद्योगिक गाळ्यांच्या बांधकामावर पोकलेनच्या सहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली. हि कारवाई आयुक्त दिलीप ढोले यांच्या आदेशानुसार अतिक्रमण विभागाचे उपायुक्त मारुती गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईवेळी अतिक्रमण विभाग प्रमुख नरेंद्र चव्हाण, सहाय्यक आयुक्त योगेश गुणिजन, कनिष्ठ अभियंता विकास शेळके, सुदर्शन काळे आदी उपस्थित होते.

# विरार -अलिबाग कॉरिडॉर प्रकल्प गतिमान

## ६० हजार कोटींची तरतूद; १२७ किमीसाठीची १३ वर्षांची प्रतीक्षा संपणार

**खारघर : पुढारी वृत्तसेवा**



विरार अलिबाग कॉरिडॉरसाठीची १३ वर्षांची प्रतीक्षा अखेर संपली असून एम एम आर डी ए यांनी या कॉरिडॉर ची मूलतः २०११ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (चचठळ) योजना केली होती. परंतु सप्टेंबर २०२० मध्ये त्याचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (चडठऊड) कडे सुपूर्द करण्यासाठी करार करण्यात आला आहे.

२०१२ मध्ये या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी फक्त २,२१५ कोटींचा खर्च अपेक्षित होता. परंतु आता यामध्ये १० पटीने वाढ झाली असून हा खर्च २१ ते २२ हजार कोटींच्या घरात गेला आहे. या संपूर्ण प्रकल्पाची किंमत १२ हजार ५५४ कोटी रुपये इतकी होती तर २०२२ मध्ये ६० हजार ५६४ कोटी रुपयांपर्यंत म्हणजे ५ पटीने वाढली आहे.

आता हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी चडठऊड ने कंबर कसली असून या प्रकल्पासाठी लागणारा निधी उभारण्याचे काम सुरू केलं आहे. तर दुसरीकडे प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याच्या दृष्टीने एमएसआरडीसीने तयारी सुरू केली आहे. आता या नव्या वर्षात मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानल्या जाणाऱ्या या कॉरिडॉरचे काम टप्प्याटप्प्याने काम करण्यात येणार आहे. येत्या ६ महिन्यांत मोरबे - करंजाडे या २० किमी लांबीच्या कॉरिडॉरच्या बांधकामाचा श्रीगणेशा होणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. विरार-अलिबाग हा १२७ किमी लांबीचा कॉरिडॉर भिवंडी, कल्याण, पनवेल, उरण, पेण, अलिबाग या क्षेत्रातून जात आहे. तसेच हा रस्ता जेएनपीटी बंदर, नवी मुंबई विमानतळ आणि शिवडी-न्हावा या ट्रान्सहार्बर लिंकला जोडला जाणार आहे.

### काय आहेत या विरार-अलिबाग कॉरिडॉर प्रोजेक्टची वैशिष्ट्ये

- विरार ते अलिबागदरम्यानच्या अनेक छोट्या - मोठ्या गावांना जोडणारा आणि त्यांचा सर्वांगीण विकास साधणारा असा हा मार्ग असणार आहे.
- १६ लेनची ही ग्रीनफिल्ड महामार्गिका असून या प्रकल्पातील २ मार्गिका बस - ॲम्ब्युलन्ससाठी राखीव ठेवण्यात येणार आहे.
- ही ग्रीनफिल्ड महामार्गिका राष्ट्रीय महामार्ग क्र. ८, ३, ४, ४ - ड, १७ भिवंडी बायपास व मुंबई - पुणे एक्सप्रेस वेला जोडली जाणार असून मुंबई ते दिल्ली एक्सप्रेस - वे मार्गालाही जोडणार आहे.
- या प्रकल्पाचे आणखी एक मोठं वैशिष्ट्य म्हणजे या महामार्गिकेत ४८ भुयारी मार्ग...

नवभारत

# नालासोपारा : बच्चा चोरी करने वाला गिरोह धराया

## पांच सदस्यों को पुलिस ने गुजरात से किया अरेस्ट

■ **नालासोपारा**, नवभारत न्यूज नेटवर्क. पूर्व के अलकापुरी क्षेत्र में रहने वाली 23 वर्षीय महिला से 2 माह की बच्चे की खरीद बिक्री करने वाले गिरोह के 5 सदस्यों को अपराध शाखा यूनिट 3 की पुलिस ने गुजरात के शिताफी से गिरफ्तार किया है. साथ ही अपहरण हुई 2 माह के बच्चे को पुलिस ने आरोपियों की चंगुल से मुक्त कराकर उसकी मां के सुपुर्द कर दिया है. घटना की शिकायत विरार पुलिस स्टेशन में दर्ज होने के कारण अपराध शाखा की पुलिस ने आरोपियों को विरार पुलिस के सुपुर्द कर दिया है. आगे की जांच पुलिस द्वारा की जा रही है.

**महिला की परिचित ने खेला घिनौना 'खेल'** : नालासोपारा के अलकापुरी में रहने वाली 23 वर्षीय महिला कूड़ा बेचने का व्यवसाय करती है. महिला को 2 माह का एक बच्चा था. उसकी आर्थिक स्थिति बेहद खराब और गरीबी के कारण उसके लिए बच्चे की देखभाल करना मुश्किल हो गया था. उसकी एक परिचित बुआ थी जो विरार के कुम्भारपाड़ा में रहती थी और कूड़ा बीनने का काम करती थी. उसने लड़के की मां को लालच दिया कि वह अमीर परिवारों के लोगों को जानती है, जो बच्चों की अच्छी देखभाल करते हैं. साथ ही मौसी ने इस बात की जानकारी अपने परिचित आरोपी कृष्णा को दी.



### 5 बेटियों के पिता ने खरीदा था बच्चे को

आरोपी कृष्ण गोविंद परमार (71) और मुकेश दहिया (48) ने बच्चे को वलसाड में रहने वाले और एक कंपनी में काम करने वाले भूषण सिंह (46) को बेचने का फैसला किया और भूषण सिंह ने इस लड़के को खरीदने का फैसला किया क्योंकि उनकी 5 बेटियां ही थीं. 27 दिसंबर की सुबह भूषण ने कृष्णा को 2 लाख 35 हजार रुपये दिए और दो माह के बच्चे को खरीदकर वलसाड स्थित अपने घर ले गया लेकिन बच्ची को बहला-फुसलाकर ठगने का एहसास होने पर उसने वीडियो सोशल मीडिया पर वायरल कर दिया.

### पुलिस ने दर्ज किया मानव तस्करी का केस

- वरिष्ठ पुलिस अधिकारियों ने मामले को गंभीरता से लेते हुए विरार पुलिस स्टेशन में मानव तस्करी का मामला दर्ज किया है. अपहृत बच्चे की तलाश तेज गति से करने के लिए अपराध शाखा यूनिट 3 की पुलिस ने 3 टीमों का गठन किया.
- जांच में जुटी पुलिस टीम ने तकनीकी जांच और मुखबीर से मिली जानकारी के आधार पर आरोपी बालकृष्ण उर्फ कृष्णा कांबले (32) को सफाले से और भायंदर से गोविंद परमार (71) और वलसाड से मुकेश दहिया (48) सहित तीनों को हिरासत में लिया. पूछताछ में मिली जानकारी के बाद बच्चे को खरीदने वाले भूषण (46) को भी वलसाड से हिरासत में लिया गया और बच्चे को उनकी चंगुल से मुक्त कराया गया.

Mumbai Edition
06-january-2023 Page No. 2
epaper.enavabharat.com

# બે મહિનાના બાળકને ખરીદનાર અને વેચનાર ટોળકીની ધરપકડ

## પોલીસે તાત્કાલિક તપાસ કરીને બાળકને સલામત રીતે તેની માતાને સોંપ્યું : તેને ૨.૩૫ લાખ રૂપિયામાં વલસાડના પાંચ દીકરીના પિતાને વેચવામાં આવ્યું હતું


**મિડ-ડે પ્રતિનિધિ**

feedbackgmd@mid-day.com


**મુંબઈ :** નાલાસોપારા-ઈસ્ટમાં અલકાપુરી વિસ્તારમાં રહેતી ૨૩ વર્ષની મહિલાના બે મહિનાના બાળકને ખરીદીને વેચનાર પાંચ આરોપીની ટોળકીની ગુજરાત રાજ્યમાં ક્રાઇમ બ્રાન્ચની યુનિટ-૩ની પોલીસે ધરપકડ કરી છે. પોલીસે તાત્કાલિક તપાસ કરતાં અપહરણ કરાયેલા બે મહિનાના બાળકને બચાવી લીધું છે અને તેને સલામત રીતે તેની માતાને સોંપવામાં આવ્યું છે. આ મામલે વિરાર પોલીસ સ્ટેશનમાં કેસ નોંધવામાં આવ્યો હોવાથી ક્રાઇમ બ્રાન્ચ પોલીસે આરોપીઓને પોતાની કસ્ટડીમાં લીધા છે અને વિરાર પોલીસ ગુનાની વધુ તપાસ કરી રહી છે.



નાલાસોપારાના અલકાપુરીમાં રહેતી ૨૩ વર્ષની મહિલા તેના બે મહિનાના દીકરા સાથે રહે છે. તેની ખૂબ નબળી પરિસ્થિતિને કારણે બાળકની સંભાળ રાખવી તેના માટે મુશ્કેલ હતી. તેની વિરારના કુંભારપાડામાં રહેતી ઓળખીતી માસી છે. તેણે છોકરાની માતાને લાલચ આપી કે તે સમૃદ્ધ પરિવારના લોકોને ઓળખે છે જેઓ છોકરાની સારી સંભાળ રાખશે. તે માસીએ તેના પરિચિત આરોપી ક્રિષ્નાને આ વિશે જાણકારી આપી હતી. એથી આરોપી ક્રિષ્નાએ ૭૧ વર્ષના ગોવિંદ પરમાર અને ૪૮ વર્ષના મુકેશ દહિયા સાથે મળીને બાળકને વલસાડમાં રહેતા અને એક કંપનીમાં નોકરી કરતા ૪૬ વર્ષના ભૂષણ સિંહને વેચવાનું નક્કી કર્યું હતું. ભૂષણ સિંહે આ છોકરાને ખરીદવાનું નક્કી કર્યું, કારણ કે તેને પાંચ દીકરીઓ હતી. ૨૭ ડિસેમ્બરે સવારે ભૂષણે ક્રિષ્નાને ૨,૩૫,૦૦૦ રૂપિયા ચૂકવ્યા હતા અને બે મહિનાનું બાળક ખરીદીને વલસાડમાં તેના ઘરે લઈ ગયો હતો. પોતાને લાલચ આપીને છેતરવામાં આવી હોવાનો અહેસાસ થતાં માતાએ આ વિડિયો સોશ્યલ મીડિયા પર વાઇરલ કર્યો હતો. એથી વરિષ્ઠ પોલીસ અધિકારીઓએ આ બાબતની ગંભીર નોંધ લઈને વિરાર પોલીસ સ્ટેશનમાં માનવ તસ્કરીનો કેસ નોંધ્યો હતો.

ક્રાઇમ બ્રાન્ચ યુનિટ-૩ની પોલીસે ત્રણ ટીમ બનાવીને અપહરણ થયેલા બાળકની શોધખોળ ઝડપી કરી હતી. પોલીસ ટીમોએ ટેક્નિકલ વિશ્લેષણ અને ગુપ્ત બાતમીદાર પાસેથી માહિતી મેળવીને સફળતાથી ૩૨ વર્ષના આરોપી બાલકૃષ્ણ ઉર્ફે ક્રિષ્ના કાંબળે, ભાઈંદરથી ગોવિંદ પરમાર અને વલસાડથી મુકેશ દહિયાની ધરપકડ કરી હતી, જ્યારે બાળક ખરીદનાર ભૂષણ સિંહની પણ વલસાડમાંથી અટકાયત કરવામાં આવી હતી અને બાળકને બચાવી લેવામાં આવ્યું હતું.

लोकमत इन्फोग्राफिक्स

# पोलिस, शेजाऱ्याला सांगूनच सोडा घर!



मंगेश कराळे | लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई तालुक्यात रात्री-अपरात्री अन् काही ठिकाणी दिवसाही घरे फोडण्याचे सत्र सुरू आहेत. त्यामुळे घर बंद करून गावी किंवा बाहेर फिरायला जाताना शेजाऱ्याला किमान सांगून जा. दिवसा हेरगिरी करून कुलूपबंद घरे रात्रीच्या वेळी फोडण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. घराला कुलूप चांगल्या दर्जाचे आणि व्यवस्थित लावावे, शिवाय आजूबाजूला किंवा शेजाऱ्यांना सांगूनच गावाला जा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. बंद घरावर चोरट्यांची नजर पडण्याची भीती असल्याने घरातील किमती ऐवज सांभाळावेत, त्याचबरोबर घराच्या सुरक्षेचीही व्यवस्था करावी.

## सोशल मीडियावर पोस्ट टाळा

सलग चार-पाच दिवस घराबाहेर असल्याने अशी बंद घरे चोरट्यांच्या नजरेस पडतात आणि यातूनच सुट्टीच्या काळात चोऱ्यांचे प्रमाण वाढते. चोरट्यांना ही संधी साधता येऊ नये, यासाठी घराबाहेर पडण्यापूर्वीच नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून केले आहे. तसेच सोशल मीडियावर पोस्ट टाकू नये, असेही आवाहन केले आहे.

## कोणत्या वर्षात किती चोऱ्या-दरोडे

| | २०२१ | | २०२२ | |
|---|---|---|---|---|
| प्रकार | दाखल | उघड | दाखल | उघड |
| जबरी चोरी | १०१ | ७५ | ३५ | २० |
| घरफोडी | ४८१ | २७९ | ५३९ | २९२ |

## घराच्या सर्व सुरक्षेची काळजी घेतली का?

घर बंद करून जाताना लॅच प्रकारातील कुलूपाचा वापर करावा. घरामधील एक दिवा सुरू ठेवावा, त्यामुळे घरामध्ये कोणी आहे किंवा नाही, याचा चोराला अंदाज येत नाही. मुख्य दरवाजा तसेच सर्व खिडक्या व दरवाजे यांचे ग्रील मजबूत व बंद आहेत का, याची खात्री केली पाहिजे. गावी जात असल्याची माहिती शेजारच्या व्यक्तीला देऊन घराकडे लक्ष ठेवण्यास सांगावे.

## घरात दागिने, रोख ठेवू नका

सध्या सोन्याचा भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने चोरटे घरफोडी करून लाखो रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेतात. यामुळे गावी किंवा बाहेरगावी जाताना सोने-चांदीचे दागिने ओळखीच्या व्यक्ती किंवा बँकेमधील लॉकरमध्ये ठेवावेत.

> आठवडाभर बाहेरगावी जाणार असाल तर शेजाऱ्यांना बंद घराकडे लक्ष ठेवण्याची विनंती करा. अपार्टमेंटमधील सीसीटीव्ही कॅमेरे सुस्थितीत असल्याची खात्री करा. सुट्टीत बंद घरे आणि दुकाने सुरक्षित राहावीत, यासाठी लक्ष ठेवण्याबाबत सुरक्षारक्षकाला सूचना द्या.
>
> **- बलराम पालकर**, जनसंपर्क अधिकारी, पोलिस आयुक्तालय

Hello Vasai
Page No. 2 Jan 06, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

आईला न सांगता परस्पर विकले : टोळीचा पर्दाफाश

# वंशाच्या दिव्यासाठी लाखोंत खरेदी केले मूल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** कचरावेचक महिलेला दोन महिन्याच्या बाळाचा सांभाळ करणे शक्य नसल्याचा फायदा घेत श्रीमंत घरातील लोक त्याला सांभाळतील, असे आमिष दाखवून तिची फसवणूक करून परस्पर बाळाची विक्री करणाऱ्या कचरावेचक वृद्ध महिलेला गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांनी अन्य चार आरोपींसह गुजरातमधून अटक केली आहे. पाच मुली असलेल्या गुजरातमधील एकाने बाळाला २ लाख ३५ हजार रुपयांत खरेदी केले. चिमुकल्याला पोलिसांनी आईच्या ताब्यात देऊन विरार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दोन महिन्यांचे बाळ आईकडे परत करताना पोलिस अधिकारी.

## लेकरु माउलीच्या कुशीत

पोलिस उपायुक्त, (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा. पोलिस आयुक्त, (गुन्हे) अमोल मांडवे, यांचे मार्गदर्शनाखाली पो.निरीक्षक प्रमोद बडाख, पो. उपनिरीक्षक उमेश भागवत, पो.हवालदार अशोक पाटील, सागर बारवकर, सचिन घेरे, शंकर शिंदे, मुकेश तटकरे, आश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव यांनी कामगिरी करून बाळ परत आणले.

अलकापुरीतील २३ वर्षीय महिला कचरा वेचण्याचे काम करते. तिला दोन महिन्यांचा मुलगा असून कुंभारपाडा येथील ओळखीच्या मावशीने तिला मुलाचा चांगला सांभाळ करणारे श्रीमंत घरातील लोक ओळखीचे असल्याचे सांगत ते मुलाला सांभाळून शिक्षण करतील, असे आमिष दाखवले. मुलाला भेटताही येईल शिवाय तुला घरखर्चाला पैसेही मिळतील, अशी बतावणी तिने केल्याने महिलेने विश्वासाने मूलं दिले. मात्र मावशीने तिच्या ओळखीच्या आरोपी कृष्णाला याबाबत कल्पना दिली होती. आरोपी कृष्णा, गोविंद परमार (७१) आणि मुकेश दहिया (४८) या तिघांनी हे मूल वलसाड येथील भूषण सिंग (४६) यांना विकले. २७ डिसेंबरला भूषण यांनी कृष्णा याला २ लाख ३५ हजार रुपये देऊन मूल विकत घेतले.

दोन दिवस झाले, तरी मावशी न भेटल्याने आणि मुलालाही न भेटता आल्याने फसवणूक केल्याचे लक्षात येताच तिने ओळखीतील लोकांच्या मदतीने सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल केला.

गुन्हे शाखा युनिट तीनच्या पोलिसांनी तीन पथके तयार केली. आरोपी बाळकृष्ण ऊर्फ कृष्णा कांबळे (३२) याला सफाळे येथून तसेच भाईंदरमधून गोविंद परमार (७१), वलसाड येथून मुकेश दहिया (४८) आणि मूल विकत घेणाऱ्या भूषण सिंग यांना ताब्यात घेतले. फसवणूक करणाऱ्या मावशीलाही अटक केली.

Hello Vasai
Page No. 1 Jan 06, 2023
Powered by: erelego.com

दैनिक
रखे खबरों की खबर
सनसनी अबतक
संपादक : विनोद कुमार तिवारी
वर्ष :12 अंक 43 | मुंबई, शुक्रवार 06 जनवरी 2023 | RNI NO: MAHHIN/2010/34120 | पृष्ठ -4 | 2₹

# विरार अपराध शाखा ०३ ने की कार्रवाई!

## दो महीने के बच्चे को बेचने वाले आरोपियों की हुई गिरफ्तारी

**वसई ;** एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच यूनिट-३ विरार ने दो माह के बच्चे को बेच रहे



आरोपी को गिरफ्तार करने में सफलता हासिल की है,यह जानकारी पुलिस अधिकारी ने गुरुवार को दी है।पुलिस ने बताया कि २७ दिसंबर को ११.०० बजे २३ वर्ष की महिला शिकायतकर्ता, समर्थ कृपा अपार्टमेंट के सामने, वीर सावरकर मार्ग,विरार (पूर्व) स्थित कृष्णा (पूरा नाम ज्ञात नहीं), महिला नाम-मावशी (पूरा नाम ज्ञात नहीं), साथ ही ३ अज्ञात पुरुष शख्स और २ अज्ञात महिलाएं आपस में मिलीभगत कर शिकायतकर्ता के दो महीने के बेटे अमीन को इस वादे पर अगवा कर बेच दिया कि वह उसकी देखभाल करेगा।इस मामले में विरार थाने में विभिन्न धाराओं के तहत एफआईआर दर्ज किया गया है।पुलिस के मुताबिक,उक्त अपराध का वरिष्ठों ने गंभीरता से लिया और पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे ( क्राइम ) व एसीपी अमोल मांडवे (क्राइम ) ने अगवा बच्चे की शीघ्रता से तलाश के लिए द्वारा दिये गये निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार क्राइम ब्रांच -३ विरार की अलग-अलग टीमों का गठन किया गया,उक्त पुलिस टीमों ने तकनीकी विश्लेषण और मुखबिरों से गोपनीय जानकारी प्राप्त की और बालकृष्णा ऊर्फ कृष्णा (३२),गोविंद रामजी परमार (७१),मुकेश प्रभुलाल दहीया (४८) व भुषण हरखीत सिंह (४६) को हिरासत में लिया। पुलिस ने कहा कि आरोपी भूषण सिंह से अपह्रत बेटे अमीन को सही सलामत हिरासत में ले लिया गया है।उक्त आरोपी को आगे की कार्रवाई के लिए विरार थाने में पेश किया गया है।उक्त सफलता पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे ( क्राइम ) व एसीपी अमोल मांडवे (क्राइम ) के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच ०३ यूनिट पी.आई प्रमोद बडाख व पीएसआई उमेश भागवत की टीम ने पाई है।

दैनिक
मुंबई, नवीमुंबई, ठाणे, पालघर, भिवंडी व कल्याण से एक साथ प्रसारित
# प्रभाव समाचार
संपादकः विशाल सिंह
www.prabhavsamachar.com
● वर्ष : ०८ ● अंक : १०६ ● ठाणे, शुक्रवार 06 जनवरी 2023 RNI No.: MAHHIN/2015/65000 ● पृष्ठः ८ ● मूल्य २ रु.

# क्राइम ब्रांच यूनिट-३ विरार ने बच्चे को बेच रहे ४ आरोपी पकड़े

**अजहर शेख : संवाददाता**

**वसई :** एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच यूनिट-३ विरार ने दो माह के बच्चे को बेच रहे आरोपी को गिरफ्तार करने में सफलता हासिल



की है, यह जानकारी पुलिस अधिकारी ने गुरुवार को दी है।पुलिस ने बताया कि २७ दिसंबर को ११.०० बजे २३ वर्ष की महिला शिकायतकर्ता, समर्थ कृपा अपार्टमेंट के सामने, वीर सावरकर मार्ग, विरार (पूर्व) स्थित कृष्णा (पूरा नाम ज्ञात नहीं), महिला नाम-मावशी (पूरा नाम ज्ञात नहीं), साथ ही ३ अज्ञात पुरुष शख्स और २ अज्ञात महिलाएं आपस में मिलीभगत कर शिकायतकर्ता के दो महीने के बेटे अमीन को इस वादे पर अगवा कर बेच दिया कि वह उसकी देखभाल करेगा। इस मामले में विरार थाने में विभिन्न धाराओं के तहत एफआईआर दर्ज किया गया है। पुलिस के मुताबिक, उक्त अपराध का वरिष्ठों ने गंभीरता से लिया और पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे (क्राइम) व एसीपी अमोल मांडवे (क्राइम) ने अगवा बच्चे की शीघ्रता से तलाश के लिए द्वारा दिये गये निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार क्राइम ब्रांच -३ विरार की अलग-अलग टीमों का गठन किया गया, उक्त पुलिस टीमों ने तकनीकी विश्लेषण और मुखबिरों से गोपनीय जानकारी प्राप्त की और बालकृष्णा ऊर्फ कृष्णा (३२), गोविंद रामजी परमार (७१), मुकेश प्रभुलाल दहीया (४८) व भुषण हरखीत सिंह (४६) को हिरासत में लिया। पुलिस ने कहा कि आरोपी भूषण सिंह से अपहृत बेटे अमीन को सही सलामत हिरासत में ले लिया गया है। उक्त आरोपी को आगे की कार्रवाई के लिए विरार थाने में पेश किया गया है। उक्त सफलता पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे (क्राइम) व एसीपी अमोल मांडवे (क्राइम) के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच ०३ यूनिट पी.आई प्रमोद बडाख व पीएसआई उमेश भागवत की टीम ने पाई है।

दैनिक आमची मुंबई

ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.

वर्ष : ११ | अंक. २५८ | शुक्रवार ०६ जानेवारी २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०८


# गुन्हे शाखा ३ ला मोठे यश

# बालक चोरी प्रकरणी ४ जणांना अटक



**वसई.** MBBV पोलीस आयुक्तालय अंतर्गत गुन्हे शाखा युनिट-३ विरारला दोन महिन्याच्या बाळाची विक्री करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात यश आले आहे. अशी माहिती पोलीस अधिकाऱ्याने गुरुवारी दिली. महिला तक्रारदार कृष्णा (पूर्ण नाव माहित नाही) समर्थ कृपा... (उर्वरीत पान ३ वर)

## गुन्हे शाखा ३ला...

अपार्टमेंट समोर, वीर सावरकर मार्ग, विरार (पूर्व), महिलेचे नाव- मावशी (पूर्ण नाव माहित नाही), ३ अनोळखी पुरुष आणि २ अनोळखी महिला व्यक्तींनी एकमेकांशी संगनमत केले. अमीन, दोन महिने- तक्रारदाराच्या जुन्या मुलाचे अपहरण करून त्याची काळजी घेईन, असे आश्वासन देऊन त्याची विक्री करण्यात आली. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली एफआयआर दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर गुन्ह्याची गांभीर्याने दखल घेण्यात आली आहे. व अपहृत बालकाचा त्वरीत शोध घेण्यासाठी पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) व एसीपी अमोल मांडवे (गुन्हे) यांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनानुसार गुन्हे शाखा-३ विरारची स्वतंत्र पथके तयार करण्यात आली, असे पोलीस पथके प्राप्त झाली. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्तहेर आणि बालकृष्ण उर्फ कृष्णा यांच्याकडून मिळालेली गोपनीय माहिती (३२), गोविंद रामजी परमार (७१), मुकेश प्रभुलाल दहिया (४८) आणि भूषण हरखित सिंग (४६) यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपी भूषण सिंगचा अपहरण केलेला मुलगा अमीन याला सुरक्षित ताब्यात घेण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. उक्त आरोपीला पुढील कारवाईसाठी विरार पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) आणि एसीपी अमोल मांडवे (गुन्हे) पीआय प्रमोद बडाख आणि पीएसआय उमेश भागवत यांच्या पथकाने गुन्हे शाखेच्या ०३ तुकड्यांना शोधून काढले आहे.

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-203 मुंबई, शुक्रवार 6 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# डीसीपी ने दो माह के अपहृत शिशु को माँ को सौंपा



**वसई:** एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच यूनिट-3 विरार ने दो माह के शिशु को बेच रहे आरोपी को गिरफ्तार करने में सफलता हासिल की है, यह जानकारी पुलिस अधिकारी ने गुरुवार को दी है। पुलिस ने बताया कि 27 दिसंबर को पीड़ित महिला की शिकायत पर विरार थाने में विभिन्न धाराओं के तहत एफआईआर दर्ज किया गया है।पुलिस के मुताबिक,उक्त अपराध का वरिष्ठों ने गंभीरता से लिया और पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे ( क्राइम ) व एसीपी अमोल मांडवे (क्राइम ) के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच -3 विरार की अलग-अलग टीमों का गठन किया गया,उक्त पुलिस टीमों ने तकनीकी विश्लेषण और मुखबिरों से गोपनीय जानकारी प्राप्त की और बालकृष्णा ऊर्फ कृष्णा (32),गोविंद रामजी परमार (71),मुकेश प्रभुलाल दहीया (48) व भुषण हरखीत सिंह (46) को हिरासत में लिया। पुलिस ने कहा कि आरोपी भूषण सिंह से अपहृत बच्चा अमीन को सही सलामत बरामद गया है। उक्त सफलता पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे ( क्राइम ) व एसीपी अमोल मांडवे (क्राइम ) के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 03 यूनिट पी.आई प्रमोद बडाख व पीएसआई उमेश भागवत की टीम ने पाई है।

मूल्य ₹ 5.00
सुविचार
दैनिक दबंग दुनिया
निष्पक्ष नज़र, निष्पक्ष खबर
अंदर पढ़ें

# दो माह के बच्चे को बेच रहे 4 आरोपी दबोचे गए

**वसई।** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच यूनिट-3 विरार ने दो माह के बच्चे को बेच रहे आरोपी को गिरफ्तार करने में सफलता हासिल की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने गुरुवार को दी है। पुलिस ने बताया कि 27 दिसंबर को 11.00 बजे 23 वर्ष की महिला शिकायतकर्ता, समर्थ कृपा अपार्टमेंट के सामने, वीर सावरकर मार्ग, विरार (पूर्व) स्थित कृष्णा (पूरा नाम ज्ञात नहीं), महिला नाम-मावशी (पूरा नाम ज्ञात नहीं), साथ ही 3 अज्ञात पुरुष शख्स और 2 अज्ञात महिलाएं आपस में मिलीभगत कर शिकायतकर्ता के दो महीने के बेटे अमीन को इस वादे पर अगवा कर बेच दिया कि वह उसकी देखभाल करेगा। इस मामले में विरार थाने में विभिन्न धाराओं के तहत एफआईआर दर्ज किया गया है। पुलिस के मुताबिक, उक्त अपराध का वरिष्ठों ने गंभीरता से लिया और पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे ( क्राइम ) व एसीपी अमोल मांडवे (क्राइम ) ने अगवा बच्चे की शीघ्रता से तलाश के लिए द्वारा दिये गये निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार क्राइम ब्रांच -3 विरार की अलग-अलग टीमों का गठन किया गया। उक्त पुलिस टीमों ने तकनीकी विश्लेषण और मुखबिरों से गोपनीय जानकारी प्राप्त की और बालकृष्णा ऊर्फ कृष्णा (32), गोविंद रामजी परमार (71), मुकेश प्रभुलाल दहीया (48) व भुषण हरखीत सिंह (46) को हिरासत में लिया। पुलिस ने कहा कि आरोपी भूषण सिंह से अपहृत बेटे अमीन को सही सलामत हिरासत में ले लिया गया है। उक्त आरोपी को आगे की कार्रवाई के लिए विरार थाने में पेश किया गया है। उक्त सफलता पुलिस उपायुक्त अविनाश अंबुरे ( क्राइम ) व एसीपी अमोल मांडवे (क्राइम ) के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 03 यूनिट पी.आई प्रमोद बडाख व पीएसआई उमेश भागवत की टीम ने पाई है।

सकाळ

# पोलिस भरतीतील वाहनचालक पदांची मैदानी चाचणी पूर्ण

भाईंदर, ता. ५ (बातमीदार) : मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाकडून सुरू असलेल्या भरती प्रक्रियेतील वाहनचालक पदांसाठीची मैदानी चाचणी पूर्ण झाली आहे. आता यानंतर पोलिस शिपाई या पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मैदानी चाचणीतील उमेदवारांची गुणांची यादी जाहीर करण्यात आली आहे. आता या उमेदवारांना कौशल्य चाचणी द्यावी लागणार आहे. या चाचणीचे ठिकाण व वेळ याबाबत उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेलवर, मोबाईल क्रमांकावर कळवण्यात येणार आहे.

पोलिस आयुक्तालयाकडून दोन जानेवारीपासून ९९६ पोलिस शिपाई आणि १० वाहनचालक पदांसाठी थेट भरती प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर ही भरती प्रक्रिया सुरू आहे. सुरुवातीला वाहनचालक पदांसाठी उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली. वाहनचालक पदांसाठी १२३७ अर्ज आले असून त्यात ११९६ मुले, तर ४१ मुलींचा समावेश आहे. चालकपदाकरता अर्ज केलेल्या उमेदवारांच्या मैदानी चाचणीचे गुणपत्रक गुरुवारी जाहीर करण्यात आले. mbvv.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर ही यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## शंका असल्यास काय कराल?

उमेदवारांना आपल्या गुणांबाबत शंका असल्यास पोलिस उपायुक्त (मुख्यालय) यांना नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे भेटून शंकानिरसन करू शकतात. तसेच sheetbransh१.mb.vv@mahapolice.gov.in या मेलवर किंवा ०२२- ३५००६११४ या क्रमांकावर ५ जानेवारी संध्याकाळी ५ पर्यंत संपर्क साधू शकता, असे पोलिस आयुक्तालयाकडून सांगण्यात आले.

Mumbai, Palghar-Today
06/01/2023 Page No. 1

# उमेदवारांना गुणांबाबत शंका असल्यास आयुक्तालयाशी संपर्क साधावा

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील चालक पोलीस शिपाई पदांसाठी २ जानेवारीपासून थेट भरती प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली होती. एकूण ९९६ पोलीस पदांसाठी ही भरती केली जाणार आहे. या पदांसाठी सुमारे ७१ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी वाहनचालक पदाच्या १० रिक्त जागांसाठी १२३७ उमेदवारांचे अर्ज आले असून, त्यात ११९६ मूल तर ४१ मुलींनी अर्ज केला होता. सलग तीन दिवस चालक पोलीस शिपाई पदांची भरती प्रक्रिया सुरू होती. मैदानी चाचणी पार करत कौशल्य चाचणी करता पात्र असणाऱ्या उमेदवारांची यादी व कौशल्य चाचणी ठिकाण व वेळ याबाबत उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत ई-मेलवर, मोबाइल क्रमांकावर कळवण्यात येणार आहे. चालक पदाकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांच्या मैदानी चाचणीचे गुणपत्रक पोलीस आयुक्तालयाच्या मार्फत सादर करण्यात आले आहे. चालक पोलीस शिपाई भरतीमधील शारीरिक चाचणीच्या गुणांची यादी ५५.स्त्रङ्क्षू. ङ्क्ष५.ल्ल या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयात देखील यादी उपलब्ध करण्यात आलेली आहे. उमेदवारांना आपल्या गुणांबाबत कोणतीही शंका असल्यास त्यांच्या शंका दूर करण्याकरिता पोलीस उपायुक्त (मुख्यालय) यांना नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान भाईंदर पश्चिम येथे भेटून त्यांना असलेल्या शंकेबाबत विचारपूस करू शकतात. भरती प्रक्रिया सुरू असलेल्या ठिकाणी गैरप्रकार होऊ नये व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी व उमेदवारांवर लक्ष ठेवण्यासाठी जवळपास ५० कॅमेरे लावण्यात आले असून, पोलिसांचे सीसीटीव्ही, भरती प्रक्रिया पार पाडणाऱ्या कंपनीचे कॅमेरे व हँडीकॅमद्वारेही चित्रीकरण करण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर कॅमेऱ्याची बारीक नजर असणार आहे. ही प्रक्रिया जवळपास दोन महिने सुरू राहणार आहे. संपूर्ण प्रक्रिया जलद व पारदर्शक पद्धतीने पार पडणार असल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला आहे.